दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.७ एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २१९ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 7 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 219 • Pages 4 • Rate 4 Rs

## जालन्यात जमिनीतून 'लाव्हा'सदृश गरम पदार्थ बाहेर

**मुंबई**–जालना शहरातील राजपूत वाडी परिसरात रविवारी (दि. ५) दुपारी एक अत्यंत दुर्मिळ आणि रहस्यमय प्रकार उघडकीस आला आहे. येथील एका विद्युत खांबाजवळील जमिनीतून अचानक लाव्हासारखा धगधगता आणि चिकट पदार्थ बाहेर पडू लागल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरल्याने परिसरात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.यासंबंधीच्या वृत्तानुसार, रविवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास काही स्थानिक नागरिकांना विद्युत खांबाच्या पायाशी गरम, अर्धद्रवरूप आणि शिलारसासारखा (लाव्हा) दिसणारा पदार्थ बाहेर येऊ लागला. जमिनीतून असा पदार्थ बाहेर येत असल्याचे पाहून नागरिक भयभीत झाले. काही तरुणांनी या घटनेचे चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित केल्याने शहरात या 'लावा'ची चर्चा वाऱ्यासारखी पसरली. नागरिकांनी सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ या ठिकाणापासून दूर जाणे पसंत केले.

# एकनाथ शिंदेंचे नेतृत्व कमकुवत होणार नाही

## अंजली दमानियांना कागदपत्रे पुरवणारा अज्ञात व्यक्ती कोण? शोधा–मंत्री उदय सामंत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अंजली दमानिया यांच्याकडे जर अशोक खरात प्रकरणी सीडीआर पोहोचला असता तर त्यांची पूर्ण कॉपी आली असती. एका हॉटेलच्या लेटर हेडवर काही गोष्टी इंग्रजीमध्ये लिहिलेल्या आहेत. त्यांनी सुद्धा काल स्पष्ट केले की अज्ञात व्यक्तीने हे दिले आहे. अशा आरोपाने काही एकनाथ शिंदेंचे नेतृत्व कमकूवत होणार नाही. उलट जनतेला एकनाथ शिंदेंना जे ते भावतात ती जनतेमध्ये वाढत जाणार आहे. त्या प्रकरणी सखोल चौकशी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.उदय सामंत म्हणाले की, अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीसाठी पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी हीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका आहे. काँग्रेस कसे पुढे जाते आणि कसे मागे पडते यावर संजय राऊतांनी वक्तव्य केले आहे, त्यावर मी जास्त काही बोलणार नाही. साताऱ्यामध्ये जिल्हा परिषद निवडणुकीवेळी काय झाले यावर कार्यकर्त्यांशी चर्चा केली, प्रत्येक गोष्ट माध्यमांसमोर सांगायची नसते.येणाऱ्या निवडणुकीत जनतेची भावना काय हे समजेल.उदय सामंत म्हणाले की, अंजली दमानियांना हे कागदपत्रे कोणी दिले, याची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे त्यातून या सर्व गोष्टी पुढे



येतील. एखाद्या व्यक्तीचे नाव घेऊन बोलण्यापेक्षा या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. तो कागद पुरवठा करणारा कोण यावर चौकशी झाली पाहिजे. खरात प्रकरणी कोण कोणाला भेटले हे सर्व जनतेला माहिती आहे. एकनाथ शिंदे हे एनडीएमधील ३ नंबरचे नेते आहेत. त्यांचे काम निवडणुकीतून दिसून आले.उदय सामंत म्हणाले की, अजित पवार यांनी अनेक वर्षे काँग्रेससुद्धा काम केले होते. राजकारणापेक्षा अजित पवार आपल्यात नाही आणि सुनेत्रा पवार ही निवडणूक लढवत असतील तर ती बिनविरोध करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तीच भूमिका शिवसेनेची आहे, आम्ही सुद्धा सर्वांना विनंती करतो की राजकारण करण्यापेक्षा आपले राजकीय संस्कार पुढे नेले पाहिजे. यातून महाराष्ट्र राजकीय संस्कार असलेले राज्य आहे असे संदेश देशभरात जाईल.उदय सामंत म्हणाले की, ओपस स्पेसमध्ये कशापद्धतीने वृक्षारोपन करता येईल त्यासंदर्भात आमची चर्चा झाली. नाट्य परिषदचे प्रमुख विश्वस्त शरद पवार आहेत त्यांच्याशी परिषदेच्या कामासंदर्भात आम्ही आज शरद पवारांची भेट घेतली. अजित पवारांच्या निधनानंतर शरद पवारांची भेट झाली नव्हती त्यांची प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी अनेक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे, त्यांचे मार्गदर्शन लाभणं फार महत्त्वाचे आहे.

## माजलगांवात भाजपा तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न; 'समाजकारणाला प्राधान्य'चा संदेश

**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगांव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे भारतीय जनता पार्टीच्या तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नव्या कार्यालयामुळे पक्षाच्या संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असून . कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. हा कार्यक्रम दि. ६ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आला होता.या कार्यालयाचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण आबा राऊत होते. यावेळी भाजपचे प्रवक्ते राम कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब चोले, तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सचिव तथा नगरसेवक दीपक मेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी ज्ञानेश्वर नाना मेंडके, शिवाजी राजवण, नितीन नाईकनवरे, डॉ. अशोक तिडके, दीपक मुंडे, अभय होके, ईश्वर



खुरपे, हनुमान कदम, शरद कचरे, प्रदीप जाधवर, कल्याण शेप, सचिन तौर, सिद्धेश्वर राठोड दत्ता महाजन, बाळासाहेब क्षीरसागर, सुभाष साळवे,आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.उद्घाटन प्रसंगी बोलताना शंकर देशमुख यांनी माजलगाव तालुक्यात भाजपची ताकद वाढत असल्याचे सांगितले. नव्या कार्यालयामुळे कार्यकर्त्यांना एकत्र येऊन अधिक प्रभावीपणे काम करता येईल. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी नमूद केले.प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास उलगडला. जनसंघाच्या स्थापनेपासून ते आजच्या सशक्त भाजपा पर्यंतचा इतिहास त्यांनी स्पष्ट केला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या बलिदानाचा उल्लेख करत कलम ३७० विरोधातील भूमिका, तसेच २०१४ नंतर देशात झालेला बदल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची वाढ यावर त्यांनी प्रकाश टाकला.

भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकारण करणारी संस्था नसून समाजकारणाला प्राधान्य देणारी संघटना आहे. या कार्यालयामध्ये ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण झाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच कार्यकर्त्यांनी पद–प्रतिष्ठेपेक्षा पक्षविचार, निष्ठा आणि जनसेवा यांना महत्त्व द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात इतर मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. उद्घाटनानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, किट्टी आडगाव मंडळ अध्यक्ष रुपाली कचरे तसेच पात्रुड अध्यक्ष डॉ. अभिजित सोळंके यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन रुपाली कचरे यांनी मानले.

## केज तालुक्यावर गारपिटीचा कहर; उभ्या पिकांचे मोठे नुकसान, तात्काळ भरपाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगाव, दहिफळ, वडमाउली, सारणी, सांगवी, सारुळ व नांदूरघाट परिसराला गुरुवारी सायंकाळी गारपिटीसह वादळी वाऱ्याचा जोरदार तडाका बसला. या अवकाळी संकटामुळे शेतीतील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन ढग दाटून आले आणि काही वेळातच जोरदार पाऊस व विजांच्या कडकडाटासह गारपीट झाली. यामुळे काढणीला आलेली गहू, ज्वारी व हरभरा ही पिके पूर्णपणे जमीनदोस्त झाली.





तसेच आंबा व टरबूज यांसारख्या नगदी फळबागांनाही मोठा फटका बसून फळांची मोठ्या प्रमाणात गळती झाली आहे. वर्षभर कष्ट करून जोपासलेली पिके डोळ्यादेखत नष्ट होताना पाहून शेतकऱ्यांनी हंबरडा फोडला. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेल्याने आता उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा. बबनराव आंधळे यांनी केली आहे.

## आवसगाव शाळेत शुद्ध पाण्याची सोय आयडीबीआय बँकेकडून आरओ प्रकल्प भेट

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

आवसगाव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला आयडीबीआय बँकेच्या सीएसआर निधीतून अत्याधुनिक आरओ पाणी शुद्धीकरण प्रकल्प भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

दि. ४ एप्रिल रोजी आयोजित कार्यक्रमात आयडीबीआय बँकेचे बनसारोळा शाखा व्यवस्थापक श्री. दीपक कोल्हे, उपशाखा व्यवस्थापक आदित्य किसन व कर्मचारी अतुल गोरे यांच्या हस्ते या प्रकल्पाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रम उत्साहात पार पडला.


यावेळी शाळेचे मुख्याध्यापक कस्पटे सर यांनी दीपक कोल्हे यांचा सत्कार केला, तर हंडीबाग सर यांनी आदित्य किसन यांचा सन्मान केला. देशमुख सर यांनी सर्व बँक कर्मचाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्तावना व समारोप तानाजी जाधव सर यांनी प्रभावीपणे केले.

कार्यक्रमास आवसगावचे सरपंच विश्वास



शिनगारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी शाळेच्या विकासासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत बँकेचे कौतुक केले.आपल्या मनोगतात शाखा व्यवस्थापक दीपक कोल्हे यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आयडीबीआय बँक कटिबद्ध असल्याचे सांगितले. पुढील वर्षी सीएसआर निधीतून शाळेसाठी स्वच्छतागृह व विद्यार्थ्यांसाठी डेस्क उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शिक्षकांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत, विशेषतः उन्हाळ्यात स्वच्छ पाण्याची उपलब्धता विद्यार्थ्यांसाठी मोठी दिलासा देणारी ठरणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून या उपक्रमामुळे शाळेच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.

## तमाशा कलावंतांवर भ्याड हल्ला; आरोपींवर ट्रॉसिटीखाली गुन्हा दाखल करण्याची मागणी



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

वाहनाला धक्का लागल्याच्या कारणावरून राष्ट्रपती सुवर्णपदक विजेत्या दिवंगत विठाबाई नारायणगावकर यांच्या तमाशा फडातील कलावंतांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा केज येथील कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. तसेच संबंधित आरोपींवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बुधवारी दुपारी सुमारास नाशिक–पुणे महामार्गावरील संगमनेर तालुक्यातील पठार भागात ही धक्कादायक घटना घडली. तमाशाचा कार्यक्रम आटोपून कलावंत पुढील कार्यक्रमासाठी माळेगाव पठारकडे जात असताना पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी थांबले होते. त्यावेळी एका दुचाकीस्वाराने त्यांच्या वाहनाला धक्का दिल्यानंतर वाद निर्माण झाला.यानंतर संबंधित दुचाकीस्वाराने इतर साथीदारांना बोलावून घेत सुमारे ५० ते ६० जणांच्या जमावाने तमाशा कलावंतांवर बेदम मारहाण केली. महिलांनाही मारहाण करत त्यांच्या कपड्यांची तोडफोड करून विनयभंग केल्याचा गंभीर आरोप आहे. तसेच काही रक्कमही लंपास करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

या घटनेबाबत घारगाव पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. विठाबाई नारायणगावकर यांचे नातू मोहित नारायणगावकर यांनी या घटनेची माहिती दिली.

या निषेधार्थ केज येथील कला क्रीडा विश्व समिती व तालुक्यातील कलावंतांनी नायब तहसीलदार श्री. अशोक भंडारे यांना निवेदन सादर केले. यावेळी अनिल वैरागे, मुनिर कुरेशी, ॲड. अनिता मुंडे, बलभीम मस्के, सचिन लांडगे, अमोल सरवदे, चंद्रकांत जाधव आदींसह अनेक कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कलावंतांवर झालेल्या या अमानुष हल्ल्यामुळे संतापाची लाट उसळली असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# ५२ लाखांचे चंदन व साहित्य जप्त नांदेडमध्ये पोलिस उप महानिरीक्षकांच्या पथकाची मोठी कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

पोलिस उपमहानिरीक्षकांच्या पथकाने अवैध व्यवसायांवर मोठी धडक कारवाई करत तब्बल ५२ लाखांचे चंदन व संबंधित साहित्य जप्त केले. नांदेड परिसरातील एका हॉस्पिटलजवळ संशयित वाहनांची तपासणी करताना ही मोठी कारवाई उघडकीस आली.

कशी उघडकीस आली चंदनाची तस्करी?

शनिवार, ५ एप्रिल रोजी डीआयजी यांच्या पथकाने नांदेड रेल्वे स्टेशनजवळील एका हॉस्पिटलसमोर उभ्या असलेल्या संशयित चारचाकी वाहनांची तपासणी सुरू केली. मात्र, वाहनात आढळले लाकडी बॉक्सेस व त्यामध्ये लपवून ठेवलेले चंदनाचे तुकडे!

वाहनातील संशयितांकडे कोणतीही परवानगी नसल्याचे स्पष्ट झाल्यावर अधिक चौकशी करण्यात आली. वाहनात ३ फूट, ४ फूट आणि विविध साईजच्या १,४७० किलो वजनाच्या चंदनाची तस्करी होत असल्याचे निष्पन्न झाले.

एकूण जप्तीची किंमत ५२ लाख रुपये पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जप्तीमध्ये समाविष्ट

१,४७० किलो चंदन: ३६,७५,०००/
वाहन किंमत : १५,००,०००/-
इतर साहित्य : १,९६,०००/-
एकूण किंमत - ५१,९६,०००/-

तस्करीसाठी वापरलेले वाहन, लाकडी बॉक्सेस, प्लास्टिक पॅकिंग साहित्य आदीही जप्त करण्यात आले आहे.

आरोपी कोण? शेख रियाज शेख महादेव (वय ३३, रा. लातूर) एक अज्ञात साथीदार दोघांवर वनअधिनियम कलम ३२, ४१, ४२ व ९४ तसेच इतर संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस उपमहानिरीक्षकांचे अभिनंदन

NR या कारवाईसाठी डीआयजी शाहाजी उमाप यांनी पथकातील पोलीस उप निरीक्षक पंकज इंगळे, पोलीस अंमलदार प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ, कामाजी गवळी यांचे अभिनंदन केले. अवैध वृक्षतोड व तस्करी करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांना आवाहन 'खबर' हेल्पलाईनचा वापर करा

अवैध व्यवसायांची माहिती त्वरित पोलिसांना कळवावी यासाठी 'खबर' नावाचा विशेष मोबाईल क्रमांक ९१५०१००१०० यावर संदेश किंवा कॉल करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे



# भामरागड तालुक्यात स्वामित्व योजनेला वेग; १० गावांचे ड्रोन सर्वेक्षण पूर्ण

## मालकी हक्काच्या सनद वाटपाचा मार्ग मोकळा

दैनिक वादळ वार्ता
**गडचिरोली । प्रतिनिधी**



भामरागड तालुक्यात स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोन सर्वेक्षणाच्या कामाला गती देण्यात आली असून दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी मौजा कथलासूर, भटपर, हितलवारा, जुव्वी, दर्भा, मलेंगा, मर्दहूर, विसामुंडी, टेकला व गुंडुरवाही या दहा गावांचे ड्रोन सर्वेक्षण करण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे.

भामरागड तालुक्यात नक्षल प्रभाव कमी झाल्याने निर्माण झालेल्या अनुकूल वातावरणाचा लाभ घेत जिल्हाधिकारी श्री. अविश्यांत पंडा यांनी विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख श्री. विजय भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रलंबित असलेल्या गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षणाची कामे भामरागड भूमी अभिलेख विभागाने पोलीस विभागाच्या सहकार्याने यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली.

तसेच मौजा बिनागुंडा, दामनमर्का व कुव्वाकोडी या गावांमध्ये पोलीस सुरक्षा परवानगी प्राप्त झाल्यानंतर ड्रोन सर्वेक्षणाची कार्यवाही करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक तजवीज ठेवण्यात आली असल्याची माहिती भूमी अभिलेखचे उप अधीक्षक श्री विठ्ठल जाधव यांनी दिली

स्वामित्व योजनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या जमिनीच्या सीमांचे अचूक निर्धारण होऊन मालकी हक्काची अधिकृत सनद मिळत आहे. विशेषतः नक्षल प्रभावित भामरागड तालुक्यातील काही गावे प्रलंबित होती. मात्र, सद्यस्थितीत तेथील सर्वेक्षण पूर्ण झाल्याने या गावांतील नागरिकांनाही लवकरच मालकी हक्काची सनद मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्वामित्व योजनेमुळे मालमत्तेच्या कायदेशीर मालकीची खात्री मिळते तसेच कर्जप्राप्तीची प्रक्रिया सुलभ होते. ड्रोन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गावठाणातील मिळकतींचे अचूक मोजमाप, नकाशे व मालमत्ता पत्रक तयार करण्यात आले असून यामुळे भविष्यातील वाद टाळण्यास मोठी मदत होणार आहे. स्वामित्व योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे जमीनसंबंधित वादांचे त्वरित निराकरण होण्यास मदत होणार असून मालमत्तेचे विभाजन अधिक सुलभ होणार आहे. अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अचूक सर्वेक्षण पूर्ण करून स्वामित्व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, भामरागडसारख्या दुर्गम व पूर्वी नक्षल प्रभावित भागातही विकास कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत.

# अनधिकृत होर्डिंग लावल्यास फौजदारी कोणाचा जीव गेल्यास सदोष मनुष्यवध

## महापालिका प्रशासनाने उचलले कठोर पाऊल

दैनिक वादळ वार्ता
**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर -शहरात कोठेही सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत होर्डिंग लावल्यास महापालिकाकडून थेट फौजदारी कारवाई केली जाईल. होल्डिंगमुळे एखादा अपघात झाला आणि सर्वसामान्य नागरिकांचा मृत्यू झाल्यास संबंधितवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची घोषणा मनपा तर्फे करण्यात आली. महापालिकेने जेव्हा अनेक अनधिकृत होर्डिंग जमा करण्याची मोहीम राबवली तेव्हा ५ ते ७ हजार होल्डिंग निघाली. जानेवारी महिन्यात होर्डिंग काढताना महापालिकेच्या एका कर्मचाऱ्याला विजेचा धक्का लागून तो मरण पावला.तेव्हापासून अनधिकृत होर्डिंग मुद्दा ऐरणीवर आला आहे. शहराचे महापौर श्री.समीर राजूरकर यांनी कठोर भूमिका घेतली.गुरुवारी अतिक्रमण हटाव विभागाने ठोस भूमिका घेतली या विभागाचे सहनियंत्रक अधिकारी श्री.संतोष वाहुळे यांनी अवैध होर्डिंग लावणाऱ्यावर फौजदारी तर अपघात झाला व कोणाचा जीव गेल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.



# हिब्बटच्या शेतक-याची कन्या पूजा मुंडे झाली पोलिस

## आण्णाभाऊ साठे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य-प्राध्यापकांनी केले सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**



मुखेड तालुक्यातील मौजे हिब्बट येथील शेतकरी रोहिदास मुंडे यांची कन्या पूजा मुंडे हीने नुकतच घेण्यात आलेल्या पोलिस भरती प्रक्रियेत अथक परिश्रमाच्या जोरावर नेत्रदीपक यश संपादन करीत अकोला पोलिस दलात सलेक्ट झाली आहे.शेतक-याच्या कन्येने पोलिस होण्याचे बहुमान प्राप्त केल्यामुळे तिचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनिची पोलिस दलात निवड झाल्याबद्दल शाहीर आण्णाभाऊ साठे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य,प्राध्यापकांनी सत्कार करुन अभिनंदन केले.

तालुक्यातील मौजे हिब्बट येथील शेतकरी रोहिदास मुंडे यांनी आपल्याकडील असलेल्या शेतीच्या उत्पन्नावरच संपूर्ण कुंटुबाचा उदरनिर्वाह चालवितात व लेकरांना शिक्षणासाठी मदत करतात.पूजा मुंडे ही लहाणपणासुनच शिक्षणात हुशार असल्यामुळे ति हळूहळू जिद्द,चिकाटी आणी अभ्यासाच्या जोरावर यशाच्या समीप पोहचत गेली.आई-वडील शेतकरी असल्यामुळे त्यांच्या कष्टाची व परिश्रमाची तिला जाणीव होती म्हणूनच पुजाने शिक्षणामध्ये अथक परिश्रम घेत नुकत्याच झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेत सहभाग घेत मेहनतीच्या जोरावर पोलिस होण्याचे स्वप्न पूर्ण केले.तिची अकोला पोलीस दलात निवड झाली.तिच्या या यशाबद्दल शाहीर अण्णाभाऊ साठे ज्यूनियर कॉलेजचे प्राचार्य वडले.बी.जी,उपप्राचार्य केरूरे एस.डी,प्राध्यापक डॉ.नागरगोजे एन.डी,प्राध्यापक शिंदे.एन.जी, प्राध्यापक स्वामी.बी.व्ही, प्राध्यापक सकनुरे.ए.एच, प्राध्यापक डांगे यूवराज, प्राध्यापक चौधरी डी.व्ही, जयवंत नागरगोजे यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.अकोला पोलीस दलात नोवड झालेल्या पूजा मुंडे हिचे पहिला ते सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिब्बट येथे झाले तर आठवी ते दहावीपर्यंतचे माध्यमिक शिक्षण अशोक विद्यालय एकलारा येथे झाले तसेच अकरावी ते बारावी पर्यंतचे उच्चशिक्षण शाहीर आण्णाभाऊ साठे महाविद्यालय मुखेड येथे पूर्ण केले.पूजा मुंडे पोलिस झाल्यामुळे मुंडे परिवार व नातेवाइकांमध्ये आंनदाचे वातावरण पसरले आहे.

# खानवटे गावातून स्वयंभू डॉनची धिंड काढणार दौंड पोलिसांनी तक्रार देण्याचे केले आवाहन!

## जागेच्या वादातून लोखंडी रॉडने डोक्यात वार;विलास जाधवला अटक!

दैनिक वादळ वार्ता
**दौंड । प्रतिनिधी**

खानवटे ता दौंड येथे जुन्या जागेच्या व्यवहारातून पेटलेला वाद थेट रक्तरंजित हल्ल्यात बदलल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.किरकोळ कारणावरून सुरू झालेल्या वादाने जीवघेणे वळण घेतल्याने गावात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

फिर्यादी प्रशांत सदाशिव कोष्टी (वय ३६, हॉटेल व्यवसाय, रा. खानवटे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,विलास तुकाराम जाधव व त्याचा मुलगा कुणाल विलास जाधव (रा.खानवटे) यांनी मारहाण केली आहे.

दि. २८ मार्च रोजी रात्री सुमारे १०:३० वाजता आणि २९ मार्च रोजी मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास जुन्या ग्रामपंचायत परिसरातील कट्टा व फिर्यादीच्या घरासमोर आरोपींनी अक्षरशः धुडगूस घातला.सात-आठ महिन्यांपूर्वी झालेल्या जागेच्या व्यवहाराचा राग मनात धरून आरोपींनी प्रथम शिवीगाळ करत



प्रशांत कोष्टी यांना लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली.यानंतर संतापाच्या भरात आरोपींनी थेट फिर्यादीच्या वडिलांवर लोखंडी रॉडने डोक्यावर जबर वार केला.डोक्यावर झालेल्या या भीषण प्रहारामुळे वडील गंभीर जखमी झाले असून त्यांचा जीव धोक्यात आल्याची भीती व्यक्त होत आहे.जाणीवपूर्वक जीवावर उठल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.गावाच्या मध्यवर्ती भागात घडलेल्या या प्रकारामुळे खानवटे परिसरात खळबळ

### दौंड पोलिसांची सिंघम कामगिरी!

उडाली असून नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.आरोपी विलास जाधव याला अटक केली असून त्याला न्यायालयात हजर केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. कुणाल विलास जाधव फरार असून लवकरच त्याला अटक करण्यात येईल अशी माहिती दौंड पोलीसांनी दिली. संबंधित आरोपींचा खानवटे गावाला प्रचंड मोठ्या प्रमाणात उपद्रव असल्याने,व सतत शेतकऱ्यांना व मच्छीमारांना ब्लॅकमेल करून पैशाची मागणी करत असतो म्हणून त्यांच्यावर झालेल्या कारवाईने ग्रामस्थांनी दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार,पोलीस उपनिरीक्षक उगले,सहा.फौ.संतोष शिंदे, पोलीस हवालदार महेंद्र लोहार यांचे कौतुक केले.या घटनेचा पुढील तपास सहा.फौ. संतोष शिंदे करीत आहेत.

# के.के.एम महाविद्यालयात स्पधा परीक्षा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**परभणी । प्रतिनिधी**

मानवत येथील के.के. एम महाविद्यालयात दि. २/०४/२०२६ रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण व्हावी व स्पर्धात्मक युगात ते टिकून राहावेत या उद्देशाने सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत एकूण १२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यापैकी गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे

प्रथम क्रमांक
सागर संतोष पांढरे
शहाणे अशोक दीपक
द्वितीय क्रमांक
धर्माधिकारी वैष्णवी आदेश
तृतीय क्रमांक
प्रशांत विष्णू उकलकर
उत्तेजनार्थ बक्षीस
रखमेश शिंदे

या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे संचालक श्री.दिलीपजी हिबारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर मुंडे, प्राचार्य डॉ.नागनाथ कदम तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पंडित मोरे यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने राज्यशास्त्र विभागाच्या वतीने अशा विविध स्पर्धांचे आयोजन नियमितपणे करण्यात येते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.भास्कर मुंडे, उपप्राचार्य के.जी.हुगे,पर्यवेक्षक प्रा. अनिल कापसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या उपक्रमाबद्दल संस्थाचालक व प्राचार्यांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.



# सौर ऊर्जा प्रकल्पामुळे शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध–खा.रजनीताई पाटील

## आनेगाव शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. शाश्वत विकासासाठी असे प्रकल्प उभारले पाहिजेत असे मत खा.रजनीताई पाटील यांनी केले त्या आनेगाव शिवारातील
केज सोलार प्रायव्हेट लिमिटेड २ मॅगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. प्रमुख उपस्थिती माजी मंत्री अशोकराव पाटील,माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील,गंगा माऊली साखर कारखान्याचे चेअरमन हनुमंत मोरे, पाटील,युसुफवडगाव पोलीस स्टेशनचे सपोनि मच्छिंद्रनाथ शेंडगे, युसुफवडगाव महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री हलकुडे,गंगा माऊली उद्योग समूहाचे प्रवीण मोरे,काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, आदित्य ग्रीन एनर्जी लातूरचे जितेंद्र बजाज, अँड अमित पाटील,तेजस्विनी पाटील,देविका पाटील,रेवती सोनवणे,
आदींची हस्ते प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मांजरा प्रकल्प शाखाधिकारी ए बी गिरी,बी एस ठोंबरे, आनेगावचे चेअरमन रवी इंगळे,शंकरराव इंगळे,
माळेगावचे सरपंच कैलास गव्हाणे, बाळासाहेब नांदे अंगदराव हंडीबाग बालाजी इंगळे भारत इंगळे अंकुश हांडीबाग, शिवाजी इंगळे, श्रीराम इंगळे, अंकुश इंगळे, श्रीराम नांदे, गोविंद दोडके, अरविंद मोरे ,प्रवीणखोडसे, जयसिंग राऊत, ज्योतीराम सावंत ,शिवरुद्र चोपणे, दत्ता निकम, पिंटू कोरसाळे, राम इखे ,ज्ञानोबा देवकर, नागनाथ कोरसाळे, नरसिंग



सोनवणे, उपसरपंच रवी सोनवणे,प्रशांत आदनाक,आबासाहेब शिंदे, यावेळी बोलताना अशोकराव पाटील म्हणालेसर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास शेतकरी समृद्ध होईल असे मत व्यक्त केले. आनेगाव गावकऱ्यांच्या वतीने शिवारात प्रकल्प उभा केल्यामुळे खा.रजनीताई पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना राहुल सोनवणे म्हणाले खा रजनीताई पाटील यांचा या भागाशी ऋणानुबंध आहे. या भागातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसभर विद्युत पुरवठा होणार असल्याने त्यांच्या जीवनात समृद्धी येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केज सोलार प्रायव्हेट लिमिटेड व्यवस्थापन यांनी परिश्रम घेतले.

# एजंटच्या माध्यमातून लग्न,पण नवरीचा दागिन्यांसह पळ–पाथर्डीत खळबळ

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी | प्रतिनिधी**

लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याने हतबल झालेल्या एका तरुणाने एजंटच्या माध्यमातून विवाह करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय त्याच्यासाठी धक्कादायक ठरला. पाथर्डी तालुक्यातील सुसरे गावात घडलेल्या या प्रकारात नववधूने लग्नानंतर काही तासांतच घरातील दागिने व मोबाईल घेऊन पळ काढल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणाचे लग्न एजंटमार्फत जालना जिल्ह्यातील एका मुलीशी ठरवण्यात आले होते. यासाठी मुलाच्या नातेवाईकांकडून मोठी रक्कमही देण्यात आली होती. बुधवारी सकाळी विवाहसोहळा पार पडला. संध्याकाळी नवरी सासरी दाखल झाल्यानंतर घरात आनंदाचे वातावरण होते. मात्र हा आनंद फार काळ टिकला नाही.गुरुवारी पहाटेच्या सुमारास घरातील सर्वजण झोपेत असताना नववधूने घरातील सोन्याचे दागिने,



मंगळसूत्र तसेच मोबाईल घेऊन पळ काढला. सकाळी उठल्यानंतर नवरी घरात नसल्याचे लक्षात येताच सर्वत्र शोध घेण्यात आला, मात्र ती कुठेच आढळून आली नाही.
या घटनेनंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नवऱ्याच्या नातेवाईकांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून संबंधित एजंटचा शोध घेतला जात आहे.
दरम्यान, ग्रामीण भागात 'एजंटमार्फत लग्न' या प्रकारांत वाढ होत असून, अशा घटनांमुळे अनेकांची फसवणूक होत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# खासगी शाळांचे शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारात प्रशासनाने जि.प.शाळाकडे लक्ष देण्याची गरज

## जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थी संख्येत घट

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर | प्रतिनिधी**

आधुनिक काळात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे अस्तित्व संकटात असून शाळांमधील विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे.
सरकारी कर्मचारी, अधिकारी ,शिक्षक यांची मुले खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेतात.
यानंतर खेड्यापाड्यातील गोरगरिबांची मुले स्थानिक पातळीवर दिसून येत आहेत. तेही खासगी शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आग्रही आहेत. याचा फायदा घेत खासगी शाळांचे शिक्षक प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या घरोघरी फिरत आहेत. सर दुसरीकडे जिल्हा परिषद शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविल्या जात असतानाही जिल्हा परिषद शाळा ओसाड होत
असल्याचे दिसून येत आहे.
सरकार शासनाने गरिबांच्या मुलांसाठी सुरू केलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बंद पडत आहेत. अनेक शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. खेड्यापाड्यातील जि. प. च्या
प्राथमिक शाळांची ही अशीच अवस्था आहे. त्यामुळे जि. प. प्राथमीक शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शासनाने राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण सामान्य कुटुंबातील तसेच मोठ्या कुटुंबातील मुलांसाठी अनिवार्य केले आणि शासकीय कर्मचारी, वरिष्ठ अधिकारी, स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, मंत्री आदींच्या मुलांना जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणे बंधनकारक केले तर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेंना अच्छे दिन ही येतील अशी प्रतिक्रिया सर्वसामान्या मधून व्यक्त होत आहेत.

**पालकांचा ओढ खाजगी शाळांकडे**

कार्यरत शिक्षकांनी प्रशिक्षित शिक्षकांना नोकरी गमवावी लागण्याची शक्यता आहे. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळा मधून सुरू होते. आणि आज पटसंख्या अभावी ते रसातळाला जात आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शासकीय अधिकारी व कर्मचारी आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देत नाहीत. खाजगी शाळांमध्ये प्रवेश द्या, त्यामुळे इतर पालकही आपल्या मुलांना खाजगी कॉन्व्हेंट मध्ये शिकविण्यास इच्छुक आहेत. सुविधा मुबलक आहेत पण मूड तोच आहे खाजगी शाळा प्रमाणेच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये ही शिक्षणाची व्यवस्था केली जात आहे. जिल्हा परिषद शाळा शाळा इमारतीमध्ये तरच चांगले दिवस येतील.

# विश्वमैदान २०२६ आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे यश

दैनिक वादळ वार्ता
**औसा | प्रतिनिधी**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर येथील विद्यार्थ्यांनी विश्वमैदान २०२६ आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदवत विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बॅडमिंटन , क्रिकेट, थ्रोबॉल व्हॉलीबॉल बुद्धिबळ, कॅरम, धावणे (मुलं – मुली)अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले. क्षितिजा लवटे सिंगल गर्ल्स कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर तुषार पवार सिंगल बॉईज कॅरम स्पर्धेत उपविजेता स्थान मिळवले. प्रेरणा बिराजदार हिने मुलींच्या बुद्धिबळ स्पर्धेत उपविजेतेपद मिळवत महाविद्यालयाचा गौरव वाढवला. मुलांच्या व्हॉलीबॉल संघानेही उत्कृष्ट खेळ करत उपविजेतेपद मिळवले. या संघात नवेदअली सय्यद (कर्णधार), उबैद शेख, दुर्गेश चौधरी, ऋषी पैकराव, राहुल जाधव, आदेश जाधव, पुष्कर जाधव आणि तेजस मुंडे यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या यशामुळे महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रातील परंपरा अधिक बळकट होत असून सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.
या यशामागे प्राचार्या डॉ. शारदा धडे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले क्रीडा समन्वयक डॉ. प्रथमेश जोशी आणि डॉ. स्नेहा बेलाले यांनी घेतलेले अथक परिश्रम, प्रत्येक स्पर्धेचे योग्य नियोजन, विद्यार्थ्यांशी सातत्यपूर्ण समन्वय व प्रभावी संवाद यामुळेच हे यश शक्य झाले. तसेच संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे ,सचिव वेताळेश्वर बावगे यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकाचे आणि विजेते, उपविजेते व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# मान्यवरांच्या उपस्थितीत माजलगावात ९८.७७ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

## सहाल चाऊस लोकांच्या कामासाठी तळमळ करणारा कार्यकर्ता–आ.सोळंके

## योजना अनने म्हणजे विकास नव्हे तर दर्जेदार काम करून घेणे हा विकास आहे–पोटभरे

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव | प्रतिनिधी**

सहाल चाऊस लोकांसाठी तळमळ असणारा शहराच्या विकासासाठी काम करणारा कार्यकर्ता आहे. मी त्यांना नगरपरिषद निवडणूकित पाडण्याचा प्रयत्न केला, परंतु लोकांनी त्यांच्या कामामुळे त्यांना स्वीकारले असे गौरवद्गार आ. प्रकाश सोळंके यांनी काढले. तर योजना अनने म्हणजे विकास नव्हे तर दर्जेदार काम करून घेणे हा विकास आहे. असे मत बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले.
मान्यवरांच्या उपस्थितीत माजलगावात ९८.७७ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ आ. सोळंके यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्र व ४ उंच जलकुंभांच्या भूमिपूजनाचा समारंभ आज सोमवार, दि.०६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १२: ३० वाजता जलशुद्धीकरण केंद्र येथे पार पडला. यावेळी व्यासपीठावर माजी आ. मोहनराव सोळुंके माजी आ. डिके देशमुख, नगराध्यक्ष शिफा बिलाल चाऊस, नारायण डक, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, मुख्याधिकारी बोंदर, उपसभापती श्रीहरी मोरे, नवनाथ धायजे, विश्वंभर थावरे, शकील कुरेशी, बिलाल चाऊस सह, इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.
यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ.प्रकाश सोळंके म्हणाले की, सहाल चाऊस यांचं नेतृत्व लोकांच्या प्रेमातून तयार झालं आहे. ही योजना प्रशासकीय काळात मी कार्यान्वित केली आहे. परंतु या योजनेच्या जलकुंभासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे कठीण काम सहाल चाऊस यांनी पार पाडले आहेत. शहरासाठी काम करण्याच्या त्यांच्या तळमळीमुळेच उपनगराध्यक्ष करण्यासाठी मी त्यांना नगर परिषदेत सहकार्य केलं आहे. असे त्यांनी यावेळी सांगितले.
माजलगाव शहरासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत



पाणीपुरवठा योजनेतुन शहरातील नागरिकांचा पाण्याचा कायमचा प्रश्न मिटणार आहे. ९८ कोटीची ही पाणीपुरवठा योजना ११ महिन्यात तयार होऊन शहरालातल्या प्रत्येक घरापर्यंत हे पाणी पोहोचणार आहे. असेही आ. सोळके यांनी यावेळी म्हणाले. तर चांगल्या गार्डनसाठी १ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असल्याचेही त्यांनी त्यावेळी सांगितले. दरम्यान शहरात अद्याप ५० कोटीची विकास कामे अजून व्हायची राहिले आहेत. त्यासाठी पैसाही उपलब्ध आहे. नगरपरिषदेने ते नियोजित वेळेत करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. तर विकास कामासंदर्भात मार्गदर्शन करताना पोटभरे यांनी सांगितले की फक्त काम खेचून आणणे विकास नाहीतर कामे दर्जेदार करून घेणे हा खरा विकास आहे. संबंधित गुत्तेदाराने पाणीपुरवठ्याचे काम दर्जेदार करावे. अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. दरम्यान माजी आ.डीके देशमुख, माजी आ. मोहनराव सोळके, नारायण डक यांचीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. तर प्रस्ताविक भाषणात शिफा बिलाल चाऊस, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी
शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागनार असल्याचे सांगत चार उंच जलकुंभांद्वारे नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा केला जाणार आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली. दरम्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोहर डाके यांनी केले तर आभार मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी मानले. यावेळी इंजिनीयर मारुती गीत्तेसह सर्व नगरसेवक नगर परिषद कर्मचारी, नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त रमाई नगर नाळवंडीची कार्यकारणी जाहीर

# अध्यक्षपदी अनिल लांडगे,उपाध्यक्षपदी रोशन कानडे,सचिवपदी रोहन जाधव,कोषाध्यक्षपदी अजय जाधव यांची सर्वानुमते निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । अमोल जाधव**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,आणि तुम्हा आम्हा सर्वांचे उद्धारकर्ते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती काही दिवसातच संपूर्ण जगभरात मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केली जाणार आहे.

अनेक ठिकाणी बाबासाहेब यांच्या जयंती निमित्त अनेक आगळे वेगळे कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित केले जातात,तसेच संस्कृतिक कार्यक्रम बरोबरच भीमगीत,अनेक स्पर्धा, अन्नदान,रक्तदान शिबिर,तसेच अनेक समाजहिताचे कार्यक्रम साजरे केले जातात.

आज रमाई नगर नाळवंडी येथे देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त प्रज्ञासूर्य मित्र मंडळ रमाई नगर आणि रमाई नगर मधील आंबेडकरी बांधव या सर्वांची उपस्थिती मध्ये जयंती ची मीटिंग पार पडली,या जयंतीच्या मीटिंग मध्ये अनेक समाजाप्रती आणि आदर्श निर्णय एकमताने घेण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जयंती उत्सव कमिटीच्या वतीने आणि प्रज्ञासूर्य मित्र मंडळ यांच्या वतीने सामाजिक,आणि सांस्कृतिक तसेच भव्य रक्तदान शिबिर त्याचबरोबर भव्य असा भीमगीतांचा कार्यक्रम आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य - दिव्य आणि आकर्षक देखाव्यासह मिरवणूक काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

या वेळी या जयंती उत्सव कमिटीच्या अध्यक्षपदी अनिल लांडगे,उपाध्यक्षपदी रोशन कानडे,सचिवपदी रोहन जाधव,कोषाध्यक्ष पदी अजय जाधव या सर्वांची एकमताने निवड करून पुढील वाटचालीस आणि कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या.

या घेण्यात आलेल्या मीटिंग वेळी युवानेते मसु जाधव, युवपत्रकार अमोल जाधव,प्रेम कोकाटे,किरण जाधव,आकाश कोकाटे,तेजस जाधव,सागर जाधव,गणेश कानडे,आदित्य जाधव,अक्षय दुनघव,आदित्य जाधव तसेच मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होता.



## दु:खाच्या राखेतून पुन्हा उभारी घेण्यासाठी 'हिमायत फाउंडेशन' चा माणुसकीचा हात; पिंजारी कुटुंबाला ४५ हजारांची मदत

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**



नियतीचा घाला कधी आणि कसा येईल याचा नेम नसतो. आयुष्याची पुंजी लावून उभा केलेला संसार आणि पोटापाण्याचा आधार डोळ्यादेखील खाक होताना पाहण्याचे दुःख काय असते, हे शेख चांदभाई शेख हुसेन पिंजारी यांच्या कुटुंबापेक्षा अधिक कोणालाही ठाऊक नसेल. मात्र, या कठीण प्रसंगात 'हिमायत फाउंडेशन'ने मदतीचा हात पुढे करत माणुसकीचे दर्शन घडवले आहे.

शेख चांदभाई हे गादी कारखान्याच्या व्यवसायातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. घरात आधीच गरिबी पाचवीला पुजलेली. त्यातच त्यांच्या दोन विधवा मुलींच्या संसाराचा आणि त्यांच्या मुलांच्या पालनपोषणाचा भारही याच वृद्ध दांपत्याच्या खांद्यावर होता. १८ मार्च रोजी चांदभाईंच्या पत्नी दुकानात काम करत असताना शॉर्ट सर्किटमुळे अचानक भीषण आग लागली. काही मिनिटांतच संपूर्ण दुकान, कच्चा माल आणि गल्ल्यातील रोख रकमेसह सर्व काही जळून खाक झाले. आयुष्याचा आधार असलेल्या या दुकानाची राख झाल्याने पिंजारी कुटुंब पूर्णपणे हतबल झाले होते.ही दुर्दैवी घटना समजताच सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या 'हिमायत फाउंडेशन'ने या कुटुंबाला पुन्हा उभारी देण्यासाठी पुढाकार घेतला. शेख चांदभाई यांचे दुकान पुन्हा उभे राहावे आणि त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटावा, या उद्देशाने फाउंडेशनच्या वतीने त्यांना ४५,००० रुपयांचा धनादेश (चेक) आर्थिक मदत म्हणून सुपूर्द करण्यात आला.यावेळी हिमायत फाउंडेशनचे अध्यक्ष मुफ्ती उमर ईशाअती, माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर, हाफिज अनवर साहब, मजहर बागवान, फहाद चाऊस, पत्रकार शेख इरशाद, फाउंडेशनचे सचिव शेख मुजीब, सहसचिव सय्यद शाकेर, सय्यद अब्दुल वाहेद, सोहेल पठाण, शेख निसार, शहेनशहा पठाण लुकमान खान, जिशान खान, सय्यद गुफरान, पठान मुजाहेद आदी मान्यवर उपस्थित होते.


एका गरीब कुटुंबाचे हसते-खेळते घर आगीने हिरावून नेले, अशा वेळी त्यांना केवळ सांत्वनाची नाही तर भक्कम आधाराची गरज होती. ती पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे, अशा भावना यावेळी फाउंडेशनच्या सदस्यांनी व्यक्त केल्या. हिमायत फाउंडेशनच्या या मदतीमुळे पिंजारी कुटुंबाच्या डोळ्यांतून साश्रू नयनांनी कृतज्ञता व्यक्त होत होती.

## मांडवी येथील एन आर पेट्रोल पंप मशीनी वर तोडफोड करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**मांडवी। प्रतिनिधी**

मांडवी.येथील एन आर पेट्रोल पंपावर 'पेट्रोल मला का देत नाही म्हणून एका वेक्तीने पंपा वार गोधळ केला येथील कर्मचाऱ्यांशि वाद घालून पेट्रोल मशीनची तोडफोड केली मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे

येथील एन आर पेट्रोल पंपावर दिनांक २७ मार्च रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास पेट्रोलचा साठा संपल्यामुळे पेट्रोल पंपावर 'पेट्रोल नाही चा फलक लावून पंप बंद करण्यात आला होता.दरम्यान, सायंकाळी अंदाजे ४ ते ५ वाजताच्या सुमारास दुषन धनलाल पवार रा. मांडवी हा पेट्रोल भरण्यासाठी पंपावर आला. त्यावेळी पंपावरील कर्मचारी कुणाल डोंगरे यांनी पेट्रोल उपलब्ध नसल्याचे सांगितले. असता कर्मचाऱ्याशी वादघालत पेट्रोल भरण्याच्या नोजलचा वापर करून मशीनची तोडफोड केल्याने पंपावरील मशीनचे नुकसान केले असता एन आर पेट्रोल पंपाचे व्यवस्थापक नितीनसिहं किसनसिहं ठाकूर यांनी




तक्रार दिल्यावरून दुषन धनलाल पवार रा. मांडवी यांच्या विरुद्ध मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढल तपास सपोनी गंगाधर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.का. कनाके करीत आहे..

## देगलूरच्या मुख्य बाजारपेठेतील परिसरात वाहतूक कोंडी नियमांची ऐशीतैशी, अधिकारी सुस्त

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर प्रतिनिधी**



देगलूर: शहरातील मुख्य बाजारपेठ रस्ता सध्या वाहतुकीच्या प्रचंड कोंडीमुळे गुदमरला आहे. विशेषतः श्री साई गणेश फोटो स्टुडिओ, हनुमान मंदिर, परिसरात जड वाहनांच्या बेकायदेशीर शिरकावामुळे सामान्य नागरिकांना पाय चालणेही मुश्कील झाले आहे. प्रशासनाने मोठ्या वाहनांना या मार्गावर 'नो एन्ट्री' असतानाही ही वाहने दिवसाढवळ्या बाजारपेठेत येतातच कशी? असा संतप्त सवाल बोलले जात असताना नागरिकांमध्ये प्रशासनाच्या भूमिकेबद्दल मोठी नाराजी व्यक्त होत आहे.

सविस्तर वृत्त असा आहे की शहरातील हा रस्ता अत्यंत अरुंद असून दोन्ही बाजूंनी मोठी व्यापारी पेठ आहे. नियमानुसार या भागात अवजड आणि मोठ्या वाहनांना प्रवेश बंदी आहे. मात्र, या नियमाची सर्रास पायमल्ली करत मोठी वाहने बिनदिक्कतपणे मुख्य रस्त्यावर उभी केली जात आहेत. यामुळे तासनतास वाहतूक ठप्प होत असून, रुग्णवाहिका किंवा आपत्कालीन सेवांनाही रस्ता मिळणे कठीण झाले आहे.प्रशासकीय अधिकाऱ्यांचे या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. ही वाहने शहराच्या मध्यवर्ती भागात पोहोचतात कशी? नाकाबंदी किंवा दंडात्मक कारवाई का केली जात नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित करत, संबंधित विभागाच्या या कार्यपद्धतीवर स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

वाहतूक कोंडीमुळे बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांची संख्या घटली असून व्यापाऱ्यांच्या व्यवसायावरही याचा परिणाम होत आहे. पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याने जनसामान्यांमध्ये प्रशासनाविरुद्ध अविश्वासाचे आणि निराशेचे वातावरण पाहायला मिळत आहे.

सामान्य जनतेचा हा रोजचा मनस्ताप कधी थांबणार? आता तरी संबंधित अधिकारी यावर ठोस पावले उचलणार का? असे नागरिकांतून बोलले जात आहेत.

## आष्टी प्राथमिक आरोग्य केंद्र रामभरोसे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णांची हेळसांड





**दैनिक वादळ वार्ता**
**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कारभार पूर्णपणे ढिसाळ झाल्याचे चित्र समोर येत असून, डॉक्टर वेळेवर उपस्थित राहत नसल्याने रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दररोज सकाळीच रुग्णांची मोठी गर्दी होत असताना डॉक्टर उशिरा येत असल्याने तासन्तास प्रतीक्षा करूनही उपचार मिळत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.स्थानिकांच्या मते, अनेक वेळा गंभीर रुग्णांनाही योग्य वेळी उपचार मिळत नसल्याने त्यांना खासगी रुग्णालयांचा पर्याय निवडावा लागत आहे. यामुळे गरीब व सर्वसामान्य रुग्णांचे आर्थिक नुकसान होत असून, प्राथमिक आरोग्य केंद्राचा उद्देशच अपूर्ण राहत असल्याचे बोलले जात आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते ,अलीम चाऊस, गणेश वैध,राजू कुरेशी आणि शेख राजू यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला इशारा दिला आहे. डॉक्टरांनी वेळेचे पालन करून रुग्णांना तत्काळ सेवा द्यावी, अन्यथा लवकरच तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.दरम्यान, संबंधित आरोग्य विभागाने या गंभीर प्रकाराकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## देगलूर पोलिसांचा आयपीएल सट्टा किंगच्या अड्ड्यावर छापा,तिघांना बेड्या

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**



आयपीएलच्या रणधुमाळीत छुप्या पद्धतीने चालणाऱ्या ऑनलाईन सट्टा बाजारावर देगलूर पोलिसांनी मोठा प्रहार केला आहे. मदनूर रोड परिसरात सुरू असलेल्या एका हायटेक सट्टा अड्ड्यावर गुन्हे शोध पथकाने छापा टाकून तिघांना रंगेहाथ अटक केली. या कारवाईत सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सट्टा विश्वातील 'लिंक' पुरवणाऱ्या चौथ्या आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

५ एप्रिल रोजी मोबाईलवर रंगला होता 'हार-जीत'चा खेळ 'हैदराबाद विरुद्ध लखनऊ' या चुरशीच्या सामन्यावर देगलूर शहरात मोठ्या प्रमाणावर पैसे लावले जात असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी व पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने मदनूर रोड भागात सापळा रचला. पोलिसांनी अचानक छापा टाकला असता, तीन तरुण मोबाईलमधील ऑनलाईन पद्धारे लाखो रुपयांची हार-जीत लावताना मिळून आले.त्यावेळी पोलिसांनी घटनास्थळावरून गौरव संभाजी शिंदे (रा. गोकुळनगर), शुभम रामलू गुल्लेवार (रा. सत्यमनगर) आणि संदीप सुधाकर मुत्तेपवार (रा. देगलूर) यांना अटक केली आहे. तपासात शिवाजी उल्लेवार (रा. गोकुळनगर) हा मुख्य संशयित असून तो या तरुणांना सट्ट्यासाठी लागणारे ऑनलाईन 'आयडी' पुरवत असल्याचे समोर आले आहे.

या सदरील धाडीत पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून रोख रक्कम, ३ महागडे मोबाईल फोन आणि एक स्कूटी असा एकूण १ लाख ५ हजार ४८९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कारवाई डीबी पथक प्रमुख तथा पोलीस उपनिरीक्षक महाजन मैसनवाड, जमादार किरणकुमार वाघमारे, शिवाजी आडबे, वैजनाथ मोटरगे, मोहम्मद इम्रान आणि श्रीनिवास चिंदमवार यांनी यशस्वीपणे पार पाडली.

शहरातील तरुणाईला विळखा घालणाऱ्या बेकायदेशीर ऑनलाईन सट्टा व्यवसायाचे कंबरडे मोडण्यासाठी देगलूर पोलीस कटिबद्ध आहेत. यापुढेही अशा कारवाया अधिक तीव्र केल्या जातील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास किरणकुमार वाघमारे हे करीत आहेत

## प.पू.मधुसूदनजी भारती महाराज यांच्या निधनाने किनवट माहूर तालुक्यात शोककळा पसरली

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

माहूर गड येथील श्री दत्त शिखर संस्थानचे महंत प. पू. मधुसूदनजी भारती गुरू अच्युत भारती महाराज (वय ९५) यांचे दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ५.०५ वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने भाविकांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर ५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता धार्मिक
विधीनुसार अंत्यसंस्कार करण्यात येणार असून, त्यासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार आहेत. भाविकांनी प्रवासाचे नियोजन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार अभिजित जगताप यांनी केले आहे.
अच्युत भारती महाराज यांच्या पश्चात १९७८ मध्ये वयाच्या ४७व्या वर्षी मधुसूदनजी भारती महाराज यांनी संस्थानच्या ३० व्या महंतपदी विराजमान झाले. तब्बल ४८ वर्षे संस्थानचा कारभार त्यांनी अत्यंत निष्ठेने सांभाळला. बालवयातच संन्यास स्वीकारलेल्या महाराजांनी साधेपणा, आध्यात्मिक चिंतन आणि भक्तिभाव४८
वर्ष संस्थानचा कारभार निष्ठेने सांभाळला
यांचा आदर्श ठेवत श्री दत्त शिखर संस्थानच्या धार्मिक परंपरा जपल्या तसेच संस्थानच्या विकासालाही चालना दिली. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच अनेक संत-महंत व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.
दरम्यान, रविवारी माहूर शहर व परिसरातील बाजारपेठ बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. प.पू. मधुसूदनजी भारती महाराज यांच्या जाण्याने आध्यात्मिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या कार्याची व शिकवणीची प्रेरणा भाविकांच्या मनात कायम राहणार आहे.महंत श्री मधुसूदनजी भारती महाराज यांना देवाज्ञा झाल्याची बातमी सुन्न करणारी आहे. त्यांच्या देवाज्ञेमुळे आध्यात्मिक क्षेत्रातील एक दीपस्तंभ हरपला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077